(Marathi)

1075/01/81

1525 30 P

Swatantrya vir Deshbhakta Talyarao Savarkar yancha Powada. in Marathi, Govt of Bombay, 6.2.40.
1525 Mar
1525
1525
M

# स्वातंत्र्य-वीर

## दे. भ. तात्याराव सावरकर

यांचा

# पोवाडा



" क्षुद्रं हृदय दौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप "

शाहिर—काशिनाथ

मूल्य २ आणे.

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1525
Date 15-1-72
GOVT. OF INDIA

Rec. 2. 2. 1940
IMPERIAL RECORD
6 FEB. 1940

## वाङ्मय प्रेमी लोकांस

# आग्रहाची सूचना

सप्रेम नमस्ते--

वाङ्मय क्षेत्रांत विहार करित असतांना आपणांस जितका आनंद होत असेल तितका किंवा त्या पेक्षांही ज्यास्त आनंद

**- उत्तम स्टायलीश -**

कपडे वापरुन होईल. अशी आमची आपणांस खात्रीची शिफारस आहे. शिवाय आपली पर्सनॅलिटी वाढेल व आपण सहज इम्प्रेशन माराल. म्हणुनच फॅशन संबंधी सर्व सल्ला खालील ठिकाणी विचारा.

सल्लागार :-- साठ्येज टेलरिंग फर्म.

घुमरेगल्ली नाका अहमदनगर.

सभ्य स्त्री पुरुषानां गायन-वादनाचे शास्त्रोक्त पद्धतानें

शिक्षण देणारी संस्था म्हणजेच

# श्यामसुरारी संगीत विद्यालय

ठिकाणा :- माळीवाडा अहमदनगर

चालकः-मास्तर ताम्हनकर. भेटण्याची वेळ सायंकाळी ५ते८

या विद्यालयांत मुलां-मुलींना व शिक्षणेच्छू प्रौढानां हार्मोनियम, दिलरुबा, गायन, फिड्ल, ल्फ्यूट, वगैरे वाद्यांचे शिक्षण काळजीपूर्वक दिले जाते. तरी संगीतप्रेमी जनतेने त्याचा अवश्य फायदा घ्यावा.

आमचेकडे वाद्यांच्यापेट्या हप्त्याने व रोखीनें मिळतात

# रामभरोसे -- हिंदु -- हॉटेल

फराळाचे ताजे व स्वच्छ

—:० पदार्थ ०:—

## उत्तम चहा --- साजूक तूप

— उन्हाळ्या करितां —

## कोल्ड्रींक --- आईस्क्रीम

मालक :- आर. बी. बोरुडे

आनंदीबाजार, अहमदनगर.

# प्रस्तावना

नगरचे शाहीर श्री **काशिनाथ,** यांनीं स्वातंत्र्य सूर्य तात्याराव सावरकर यांचा हा विस्तृत व स्फूर्तिदायक पोवाडा योग्य वेळीं लिहून प्रसिद्ध केला आहे. जुन्या शाहीरी थाटांच्या पोवाड्यांत अतिशयोक्ति वा दंतकथा यांची सरमिसळ असेल पण विद्यमान व्यक्तीच्या संबंधाच्या पोवाड्यांत तसें चालणार नाहीं. श्री. काशिनाथ यांच्या पोवाड्यांत सावरकरांसंबधीं आजवर प्रसिद्ध झालेली विश्वसनीय अशीच माहिती क्रमवार ग्रथित केली आहे. काव्य विषयाशीं समरस होऊन त्या त्या प्रसंगीं उत्पन्न झालेल्या भावनांचे आत्मीय तेनें चित्रण करणे ही गोष्ट काशिनाथ यांचे पोवाड्यांत साध्य झाली आहे. देशांत ज्याज्या भावनेच्या खळबळी होतात त्याचे प्रतीबिंब शाहीरांच्या वाणींत दिसते. आज तात्याराव सावरकर यांच्यासंबंधानें पोवाडे प्रसिद्ध होत आहेत यावरून यांच्या मुक्तते नंतरच्या चळवळीने व तेजस्वीकार्य प्रचारानें महाराष्टांतील जनतेचीं मने किती आकर्षित केलीं आहेत याचें सहज समर्थन व प्रत्यंतर लाभातें.

काव्याला विषयभूत होइल असेंच तात्यारावांचे आजवरचें चरित्र अद्‌भूत रम्य आहे. अंदमान भोगुन परत आलेले कांहीं थोडें लोक हिंदुस्थानांत आहेत. पण त्यापैकीं बहुतेक निराश व अर्धमेले होऊन आलेले आहेत ते ज्यावेळेला गेले त्यावेळचें त्यांचे तेज वउत्साह ही अंदमानाच्या खडतर जीवनामुळे पार लोपुन गेलेली आढळतात.

सावरकरच काय तेअसें दिसतात कीं तेजसें गेले तसें तरत आले. अंद_ मानानें देहावर काय परिणाम केला असेल तो असो. पण त्यांचे क्रान्ति- वादीमन व खळबळ उडविणारा उत्साह यांना अंदमानातील काळेंपाणी यंत्‌किंचितही कलंकित करूं शकलें नाहीं - - चिखल फासला कलश घासला । अधिकाधिक तो उज्वल झाला । ह्या ना. वा. ठिळकांच्या युक्तिप्रमाणें सावरकरांची तेजस्वीता अंदमानामधून आल्यावर अधिकच झळकली चार सहा महिन्याच्या तुरूंग वासानें दहा दहा पौंड वजन घटवून आलेल्या व पुढें त्या निमित्तानें सहा सहा महिनें वैद्यकीय उपचारासहित विश्रांती घेणाऱ्या नाजुक लोकांनी सावरकरांच्या या कणखर वृत्तोचा कल्पनेंनें तरी थांग घ्यावा. व आपण त्यांच्या परिस्थितीत असतो तर आपली काय अवस्था झाली असती याचें प्रामाणिक पणानें कल्पना चित्र मनाशी उभे करावें.

सावरकरांच्या उद्‌बोधक प्रचारामुळें हिंदू तरुणांमध्यें नवें चैतन्य उत्पन्न झालें आहे. ज्या वेळीं लोकांत प्रस्तूत झालेली एखादी खळबळ केवळ वर्तमानपत्री वाङ्मयातच नव्हे तर काव्य नाटकादि स्थायी वाङ्मयांत परिस्फुट होते त्यावेळी ती खळबळ वरवरची नसून खोल रुजत आहे. असें समजावें सावरकरांचें पोवाडे हें यांच गोष्टीची साक्ष देत आहेत " उत्कट भव्य तें वरावें मिळमिळित अवघेंची टाकावें " हा शाहिराचा बाणा असतो. महाराष्ट्र शाहीर सावरकरावर पोवाडें रचण्यास अहमामिकेनें पुढें येत आहेत. यावरून सावरकरांच्या काव्याची उत्कट- ता लोकांच्या मनांवर ठसत चालली आहे. हेंच दिसून येतें सावरकरांचे

विस्तृत गद्य चरीत्र वाचण्यानेंही कदाचित जो परिणाम होणार नाहीं तो तासभर काशिनाथांचा हा पोवाडा वाचण्यानें व ऐकण्यानें लोकांच्या मनांवर होईल यांत शंका नाहीं गणेत्सवाच्या वेळींच तो प्रसिद्ध होत आहे हीफार चांगली गोष्ट आहें, व सर्व महाराष्ट्र शाहिर गणेशोत्सवांत त्याचा प्रसार करतील अशी आशा आहें.

ग. वि. केतकर

## हद्गत

प्रस्तुत पोवाडा करून एक वर्ष झालें. गेल्या सालीं सावरकर जयंतीचे दिवशीं मी हा पोवाडा म्हटला त्यावेळीं छापण्याबाबत अनेकाकडून अनेकवार प्रोत्साहन मिळालें. गेल्यासालीं सावरकरांचा उत्कृष्ट पोवाडा करणारास पुण्यातर्फे बक्षीस लावलें गेलें होतें. त्यावेळीं सुद्धा हा पोवाडा माझे जवळ तयार असून सुद्धां मी जाऊं शकलो नाहीं. यासर्व परस्थितींत एक वर्षभर “ दरिद्राणां मनोरथाः ” या दुर्दैवी न्यायानें हा पोवाडा माझें संग्रहांत पडून होता. परंतु “ भात्रीचेत्न तदन्यथा, ” या सुभाषिता प्रमाणेंच आज ही गोष्ट घडून येत आहे. चालू सालचे शिवजयंती उत्सवांत व्याख्यान देण्याकरितां दे. भ. डॉ. **ना. दा. सावरकर** येथें आलें असतां त्यांस हा पोवाडा म्हणून दाखविण्यांची संधी मला मिळाली व त्यांनींही छापण्याचे बाबतींत उत्तेजन दिलें. ह्या पोवाड्यानें तरुणांना स्फूर्ति मिळतें असो मलाही अनुभव होता. ह्या गोष्टी घडत असतांनां चि. **अच्युतानें** माझा पोवाडा माझें न कळत छापावयासही टाकला होता.

हा पोवाडा लिहीण्यात नगर येथील डॉ. र. ग. भोपे यांनीं लिहिलेल्या तात्यारावांचें जिवन चरित्राचा मी भरमाप उपयोग करून घेतला आहे. त्यांबद्दल मी त्यांचें रुण व्यक्त करतो. महाराष्ट्र प्रकाशन संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या जीवन चरित्राचाही मी संदर्भार्थ उपयोग करून घेतला आहे. दे. भ. तात्यारावांचे एकनिष्ठ भक्त नगरचे श्री. दादाराव सदावर्ते यांनीं वेळोवेळीं मला प्रोत्सान नि सहाय्य दिलें, येथील मॉडर्न हायस्कूलचे विद्वान प्रधानाध्यपक श्री. द. वि. आपटे (एम् ए. बी.टी) यांनीं पोवाडा तपासून सूचना दिल्या या बद्दल मी त्यांचे आभार मानतो.

मराठा पत्राचे संपादक, केसरींचे विश्वस्त नि दे. भ. तात्यारावांचे एकनिष्ठ भक्त दे. भ. श्री. ग. वि. केतकर यांनीं प्रस्तावना लिहून माझें कैातुक करून मला दिलेल्या प्रोत्साहना बद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.त्याचप्रमाणें हिंदुयुवक वसंतराव कुलकर्णी, शांताराम वाळिंबे, बाबूराम मोरे, चि. अच्युत, चि. दिगंबर या तरुणांनी दिलेल्या साहाय्यःबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. पुस्तकांत आपल्या जाहिराती देऊन मला ज्या सद्गृहस्थांनीं उपकृत केलें आहे त्यांचा मी ऋणी अहे.

राजकीय मतभिन्नता असून सुद्धां दे. भ. तात्यांरावांचें उज्वल चारित्र्याबद्दल अभिमानयुक्त आदर असणाऱ्या इतरपंथीय अनेक लोकांपैकीं मीएक आहे. राजकीयमतांचें अधिकरण भिन्न असलें तरी स्वतंत्र्यप्रिय हिंदी विरा बद्दल अभिमान युक्त आदर दर्शविण हें हिंदीजनांचें कर्तव्य आहे. आपल्या देशांत सध्यांतरी या गुणाची जोपासना होणें जरूर आहे.

नम्र. काशिनाथ

# डॉ. सावरकरांचा आशिर्वाद

ती. स्वातंत्र्यवीर बा. सावरकर यांच्यां अदभुत चरित्रावर आपण जो पोवाडा रचला आहे. तो मी नगरला ता. ८।३।३९ ला शिव जयंतीच्या उत्सवानिमित्त आलो असतां आपल्याच तोंडुन ऐकला. आपण चरित्र कथेशीं समरस होऊन केलेल्या या पोवाड्यांत आपल्या भावनाचे उत्कृष्ठ प्रतिबिंब पडले आहे, नि त्यामुळें आधिक उत्क्षोभक नि स्वातंत्र्य प्रेमानें ओथंबलेल्या चरित्रातील घटना वर्णिताना श्रोत्यांच्या मनांना स्फूर्तीच्या उद्रेकानें तुमचें पोवाडें गायन हलवून सोडते. असाच उपक्रम आपण पूढें चालु ठेवल्यास या कलेंत उच्चांक पटकवाल अशी बळकट आशा वाटते. आपल्या या कलेच्या द्वारे आपण हिंदु-संघटनाचें प्रचार कार्य करीत राहिल्यास ही कला सत्कार्यीं लावल्याचें पुण्यही आपल्या पदरीं पडेल. आपला अखंड उत्कर्ष होवो' असं चिंतिणारा.

आपला,

**ना. दा. सावरकर**

# लक्ष्मीनारायण प्रेस

बॉक्समेकर ॲन्ड आर्टप्रिंटर्स

चौपटीकारंजा, अहमदनगर.

-आमचे कडे-

बॉक्समेकिंग व सर्व तऱ्हेंची छपाईची

कामें केली जातात.

# स्वातंत्र्य-सूर्य तात्याराव सावरकर

## --:० यांचा पोवाडा ०:-

### प्रथम किरण

**चाल १ ली.** स्वातंत्र वीर सावरकर । योध्दे आनिवार [ महावीर ] प्रतापी शूर । लाभले हिन्दुभूमिस अजला । हिन्दुधर्माच्या रक्षणाला । कृष्ण अवतार घेऊनि आला ।।जी.।। छत्रपति शिवाजि अवतरले । संभाजी झाले । तानाजि बाजि गेले । हिंदुधर्माच्या रक्षणाला पेशव्यांनि किर्ति झेंडा नेला । अटकेपार साऱ्या जगांत गेला ।। जी. ।। रामचंद्र कृष्ण भगवंत । पांडव ऋषि संत । जन्मले ज्यांत । कीर्ति त्यांनिं नेली साऱ्या जगतांत । हिन्दु धर्माचि तिन हि लोकांत । अमर केला हिन्दुधर्म विश्वांत ।। जी. ।। तत्वज्ञान आमुचे भले वेड लावले । खूप त्याने केले । विश्वातिल साऱ्या थोरलोकांस । लाविला त्यांना हिन्दुधर्माचा हो ध्यास । त्याचे विना गोड लागेना त्यांना घास ।।जी.।।

### चाल २ री.

संगीत कलाकौशल्य । विद्येत हिन्दु अग्र गण्य ।।जी.।।
राजकारण समाजकारण । त्यांत श्रेष्ठ हिंदु नीपुण ।।जी.।।

**चाल ३ री.** अयुर्वेद शास्त्र आमुचें राहिलें भलें ।।जी ।। योग शास्त्र हिंदुधर्मात किती वाढलें ।।जी ।। वाचून एस् डी. विलायतचे खूप फार झालें. ।।जी ।। धातुकाम शिल्पकला पाहुन गारेगार झालें ।। जी. ।।

कोरीव लेणि पाहूनी थक्कते झाले. ॥जी.॥ ज्योतीष शास्त्र साऱ्या जगात श्रेष्ठ हो ठरले ॥जी. ॥ संभार शास्त्राचा पाहुन डोलु लागले ॥ जी.॥ परि आज आमुचे भाग्य लयाला गेले ॥ जी. ॥

**चाल १ ली.** हाय फेराकालाचा आला । सत्यनाशझाला । हिंदुधर्म मेला साऱ्या विश्वांत हीन ठरला । तुडविती पायाखालति अजला । छिन्न-विच्छिन्न होऊनि गेला ॥ जी. ॥ अेकेकालिं भोगला स्वर्गवास । आला दैवास । हाय विपरीत काल आला । हिंदुधर्मास घात झाला । आमुचा आमुचा आम्हि आत्मघात केला ॥जी.॥ आज कुठे हिन्दुना नाहिं मान । होतोय अपमान । नरका सारखि घाण । येते हिंदुची जगांस अजला । सभोंवति मज्जाव त्यास झाला । जर हिंदु जवळ ही आला । शिव्या शाप देती हो त्याला । बुट लाथा मारति कुत्र्याला । मारुनी साऱ्या हिन्दुला धाडती नरकाला ॥ जी. ॥

**चाल ३ री** सौभाग्य शून्य हिंदुधर्म आज हो झाला ॥जी॥ आपत्कालि त्राता नाही कुणी हिन्दु धर्माला ॥ जी. ॥ ख्रिश्चन मुसलमिन् लोक बुडविति त्याला ॥जी.॥ अल्लाखान हिंदुच्या देती फास नरडिला ॥जी.॥ येशुचे भक्त येउनी भक्षिती त्याला ॥ जी. ॥ एक शेंडी तोडुनी लावतो खालिं दाढीला ॥ जी. ॥ राम कृष्ण भेदुनी एक दावतो येशुला ॥जी.॥ अल्ला येशु भक्तानी मारल हिंदुधर्माला ॥ जी. ॥ जंतुनी क्षयाच्या घेरल हिंदु शरिराला ॥ जी. ॥

**चाल १ ली.** परधार्मि देवळें फोडिती । बायका पळविती । गाई मारती। त्यांची खंत नाहिं अम्हांस । सहिष्णुता आमचि मारि अम्हास । अहिंसा होइ कारण घातास ॥ जी ॥ लाज कशी वाटेना तुम्हांस ।

हिंदु लोकास । सहन करण्यास । हल्ले अपमान कितिक झाले । बलात्कार अत्याचार झाले । हिंदुनीं सारें सहन केले ॥ जी. ॥ चला उठा हिंदु सिंहानो । आर्य पुत्रांनो । सिंह भक्तांनों । करा तुम्हि सिंह गर्जना हो आज । जर असेल रक्त अगांत । जर असेल जोर दंडात । हिंदु बीज असेल देहांत । व्हा दंड थोपटुनि पुढें उभे समरांत ॥ जी. ॥ करावंदन भगव्या झेंड्याला । रामकृष्णाला । शिवाजी संभाजिला । आठवा हिंदुधर्म चित्तात । जर असेल चाड धर्माची । पूर्वजांची हिंदुवंशाची । घ्या धर्म रक्षण लिहुन शपथ रक्ताची ॥ जी. ॥ असा संदेश जयानें दिला । हिंदुवतरुणाला । आर्य सिंहाला । हिंदुचे तात्याराव रणस्वार । पोवाडा त्यांचा आज स्मरणार । शाहिर काशिनाथ गाणार ॥ जी. ॥

## द्वितीय--किरण

**चाल १ ली.** १८८३ सालांत । भगुर गांवांत । नाशिक जिल्ह्यांत । जन्म झाला विर विनायकाचा । भाग्य रवि हिंदु स्वराज्याचा । उगवलो आर्य भारताचा ॥ जी. ॥ शिवाजिची जशी जिजामाई । तात्याची राधामाई । पुण्यवंत आइ । जन्म तिनें दिला तात्यारावांस । केल धन्य तिन हिंदुराष्ट्रास । ललामभुत झाली साऱ्या जगतास ॥ जी. ॥

**चाल २ री.**

जिजामाइ गुरु शिवाजिची । राधामाइ तात्यारावांची ॥ जी. ॥
शिकवण हिंदुधर्माची । दिली माहति आर्यधर्माची ॥ जी. ॥
राम कृष्ण धर्म वीरांची । वेद कथा आर्य पुत्रांचि ॥ जी. ॥
अभिमान ज्योत धर्माची । फुलविली तात्यारावांची ॥ जी. ॥

**चाल ३ री.** इतिहास पुराणे धर्म ग्रंथ वाचिलें ॥ जी. ॥ वडिलांनीं काव्य विज्ञान सर्व पढविलें ॥ जी. ॥ तात्याराव हिंदुराष्ट्राचें शाहिर झालें ॥ जी. ॥ ह्या बाल वयामध्यें धर्म बीज रोवलें ॥ जी. ॥

**चाल १ ली.** हनुमंत उडालें गगनांत । सूर्य गोलांत । अभिमान्यु व्यूहांत । गेलें तसें तात्यांराव समरांत । बालपणि हिंदुधर्म क्षेत्रांत । पदापर्ण केले त्यांनि विश्वांत ॥ जी. ॥

**चाल ३ री.** हिंदु मुस्लिम दंगे किति झाले पुण्या मुंबइला ॥ जी. ॥ म्लेच्छानिं ठार मारलें कितीक हिंदुला ॥ जी. ॥ अन्याय म्लेच्छानी केला त्याच वेळेला ॥ जी. ॥ हें वृत्त कळुनिया आलें बाल तात्याला ॥ जी. ॥ कृष्णाने रुदन आक्रोश नाद ऐकिला ॥ जी. ॥ ऐकुनी नाद तो सिंह चवताळुनि गेला ॥ जी. ॥

**चाल ४ थी.** जमा केल बाल मित्राला । तात्यावीर बोलुं लागला । तुम्हि सारे थंड कां झाला । आग लागलि हिंदु धर्माला । पहा जरा फाडुन डोळयाला । म्लेच्छानीं केला हो हल्ला । लाथ मारली भगव्या झड्याला । कांहीं लाज नांहिंका तुम्हाला । कां हिंदु रक्ताचे झाला । अभिमान स्वर्ग लोकाला । कां तुमचा मारा हा गेला । ऊठा ऊठा आर्य पुत्रानों ह्योच वेळेला ॥ जी. ॥ जय हिंदु धर्म की घोष नाद हो बोला ॥ जी.॥ तो धर्म वीर संभाजी आठवा त्याला ॥ जी ॥ शिवबास आठवा ताना राणा प्रतापाला ॥ जी ॥ असं म्हणुन धर्म सिंह तो चालुनी गेला ॥जी.॥ तया मागे बाल वीरांचा घोळका गेला ॥जी॥ शिवबाचे पाठिमागुनि मावळा गेला ॥जी.॥ [ चाल ब. ] बालवीर गेले

मशिदिला । मावळ्यांनि हल्ला हो केला । जेरिस आणलें म्लेच्छाना । त्या छोट्या भगुरगांवाला । तयार केल हिंदुसेनेला । रोविल भगव्या झेंड्याला । जय हिंदुधर्म कीं घोष नाद हो झाला ॥जी ॥ त्यांनीं एक संघ बनविला । त्यांनि केल पुढारि तात्याला । तो संघ साऱ्या भगुरांत श्रेष्ठ हो झाला ॥ जी. ॥ तरवार जंबिया पट्टा खेळति मावळो ॥ जी. ॥ मध्यें रोवति भगव्या झेंड्याला । बुर्ज राहाति वीर बाजूला । अेकाबाजुनें मुसलमिन् सारे करिति हो हल्ला ॥जी. ॥ देऊनी सारामावळा अडविती धुल्ला ॥ जी॥ असे खेळ कितीक खेळती भगुरगांवाला ॥ जी. ॥

## तृतीय-किरण

**चाल १ ली.** १८९७ सालाला । ग्रंथिज्वर झाला । हाँहाकार झाला । वेढले त्यांन सर्व पुणें शहरास । रॅंडसाहेबान छळल लोकांस । जिवंत प्लेग लागला पुणें शहरांस ॥ जी. ॥ आधिलोक सारे त्रासलेले । दुःखिकष्टिझाले । मोतिनें मेले । तशामधिं राणिचा उत्सव केला । वज्रघात झाला काळिजाला । लोकांचा चित्तक्षोभ झाला ॥ जी. ॥ चोहिकडे आगपेटलि । चिताभडकली । ज्वालावर आली । यज्ञकुंडांत रॅंडसाहेबास । फेकुनीबळी दिला देवास । झालासंतोष जनता देवास ॥ जी. ॥ कातडी गोरिलाल झालि । द्वेषानें भरली । मदोन्मत्त झाली । पकडले त्यांनि कितीक लोकांस । फांशिदिले रानडे चाफेकरांस । डांबिले लोकमान्या टिळकांस ॥ जी. ॥ [चाल ब.] अभिमान धर्माचा प्रखर किती गोऱ्याला ॥ जी. ॥ अेखाद्या हात लावला गोऱ्यासाहेबाला

॥ जी. ॥ तर सारे गोरे लोक धांवतिल त्याच्या मदतिला ॥ जी. ॥ गळ्या मिठी मारती हिंदुसाऱ्या विश्वांला ॥जी. ॥ आला पुळका साऱ्या विश्वाचा हिंदु लोकांला ॥ जी ॥ पर हिंदु धर्मा मधि कोणि पुसेना — कोणाला ॥ जो ॥ [ चाल ब. ] जवा वृत कळल तात्याला । दिली फाशी राष्ट्रवीरांला । पकडुनि नेल टिळकाला । तात्यावर बेभान झा— ला । देशाविना सुचेनां कांहिं तात्यारावांला ॥ जी ॥ त्या रात्रि बोलला देविला । शिवराज भवानि मातेला । " आंबाबाई " रोष कां केला । स्वातंत्र्य देशि जगताला । सारे विश्व तुडवि हिंदुला । कोठे मान ना- हिं आम्हाला । दारिद्र्य मारि देशाला । आम्ही जगुन मुंग्यावानि जातो घोर नरकाला ॥जी॥ त्याचि खंत नाहिं जगतांत तुझ्या भक्ताला ॥जी॥ टोंळधाड आली गिधाडांचि आज देशाला ॥जी॥ आइ पोपकाय आम्हि केल सांग तूं मला ॥जी.॥ स्वातंत्र्य सर्व सुखधाम हिंदुराष्ट्रालां ॥जी ॥ अपुनी करावे सुखी हिंदुराष्ट्राला ॥ जी ॥ मग देविबोललि तात्याला । कायवेड्या बोलसी बोला । उपदेश करिसि तू भला । काय द्यावें षंढ राष्ट्राला । सुखा सुखी देतो स्वातंत्र्य कोण कोणाला ॥ जी ॥ लढुनिया शिवाबा तुझागेला । देशार्थ संभाजी मेला । कितिकांनिं यज्ञकुंडांत फेकल जिवाला ॥ जी ॥ शौर्यनें हिंदुराष्टाचा झेंडा फडकवला ॥ जी ॥ शिवबा नाहीं येऊन भेटला । याचना केलि नाहीं मला । तरवार उपसुनी गेला वीर युद्धाला ॥जी॥ स्वातंत्र्यबोर मागति कधि न भिक्षेला ॥जी॥ षंढानि मागाव भिक्षेलां । लावात्रा हात दैवाला । सत्यनारायण बोलावे त्याला । नवसांनिं भारावें त्याला । देवकधीं भेटतो वेड्या

पंड राष्टाला ॥ जी. ॥ इंग्रजांनीं आत्मयज्ञान घेतलं राज्याला ॥ जी. ॥ लोकमान्य कर्म योगाने पूज्य देशाला ॥ जी. ॥ जाहलें आत्म त्यागानें वंद्य जगताला ॥ जी. ॥ सोडुनी क्लैब्य दौर्बल्य जावें समराला ॥ जी ॥ तेज स्विकरावें हिंदु धर्म राष्ट्राला ॥ जी ॥ जा बाळ ध्येय निष्ठेन लाग कार्याला ॥ जी ॥ हा आशिर्वाद अैकुनी वीर उभा ठाकला ॥ जी ॥ वंदिल नम्र भावान पूज्य देवीला ॥ जी ॥ **चाल १ ली.** ठेऊनि देवि साक्षिला । पूज्य मूर्तीला । स्मरुनि शिव-बाला । तात्यारावांनीं घेतल शपतेस । कीं करिन मुक्त देशाला । नाहिं भिणार आपल्या जीवाला । तळ हाति घेइन देहाला । आर्पिन स्वतःचा देह माय भूमीला ॥ जी ॥ बनविला त्यांनीं मित्र मेळा । हिंदु राष्ट्राला । मुक्त करण्याला । शिवबानें मावळा गोळा केला । ध्येय निष्ठेन सज्ज झाला । हिंदवी सिंह जागा झाला ॥ जी ॥ [ चाॅल ब.] एके दिवशि तात्या बोलले मित्र मेळ्याला ॥ जी ॥ देशार्थ धर्मा सांठिं करा वीर कर्माला ॥जी॥ आलांत आणि गेलांत काय जगताला ॥जी॥ पशुपक्षि येति आणि जाति परत स्वर्गाला ॥ जी ॥ कशासाठीं जन्म जगतांत तुम्ही घेतला ॥जी ॥ किति बायका येति जाति वरतिस्वर्गाला ॥ जी ॥ तुम्ही पुरुष जन्म घेतला । कराकांही विरकृत्याला । ना तरी बागड्या भरुन भाजा रोटीला ॥ जी ॥ आज हिंदुधर्म विश्वात नामशेष झाला ॥जी॥ परक्यांनिं मायभूमीत नाच सुरुकेला ॥जी॥ तो भगवा झेंडा केव्हाच फाटुनी गेला ॥ जी ॥ का हिंदु म्हणता आपणाला । अभिमान कसा शुन्य जर झाला । का नाहित डोळे तुम्हालां । कां

कान गेले स्वर्गाला । या ऐका हिंदमाता हि फोडी हंबरडा ।। जी. ।। या पहा सांडला ईथें रक्ताचा सडा ।।जी।। हा हिंदुप्रेतांचा ढीग येउन। चढा ।।जी ।। तानाजि बाजि रणगाजी । शिवाजि संभाजि संताजि नेताजि गेलें अर्पुनी देह देशास । मुक्त त्यांनि केलं धर्म राष्ट्रास । व्हावा तसा मित्रमेळा देशास ।।जी।। तोडुनी दास्यशृंखला । मुक्ति राष्ट्राला । देउनि जीवाला । धन्यजगीं व्हावा मित्र मेळा । शिवाचा मावळा जसा हो झाला । अजरामर तिन्हीं लोकिं झाला ।। जी ।।

## चतुर्थ-किरण

१९०५ सालाला । बंगभंगाला । हाहाकार झाला । साराबंगाल पेटुनि गेला । महाराष्ट्र सिंह जागा झाला । गर्जना नाद त्याने केला ।। जी ।। चतुःसूत्रि आलि अमलांत । महाराष्ट्रांत । पुणें शहरांत । तात्यानी उडी घेतलि यज्ञांत । वीर ठाकला उभा समरांत । जसा अर्जुन कुरुक्षेत्रांत ।।जी।। [ चाल ब. ] सहासालि पुणें शहरांत सभा जाहली ।। जी. ।। उपदेश ऐकण्या साठिं गर्दि लोटली ।। जी. ।। टिळकांचि स्वारि येऊनी मध्यें बैसली ।। जी. ।। अगणीत आलिहो हिंदुतरुणमंडळी ।। जी. ।। अग्रभागि चांद बैसले तारे भवताली ।। जी. ।। तात्यावीर हिंदवी सिंह बोलु लागला ।। जी ।। अम्बरी कडाडून मेघनाद जणू झला ।। जी. ।। तात्यांनी मारली हाक हिंदु तरुणाला ।। जी ।। सिंहानो काय झोंपला । बंगाल पेटुनी गेला । आग लागली साऱ्या देशाला । त्यांची लाज नाहिका तुम्हाला । स्वाभिमान तुमचा कसा आज लयाला गेला ।। जी ।। एक-धनगर येऊनि हाकतो साऱ्या मेंढ्याला ।। जी ।। शिवबाचे मराठे तुम्ही

जन्माला आला ।। जी ।। झांशिच्या शूर राणिच्या वंशाला आला ।।जी।। निर्लज्ज होऊनी घालतां विदेशि कपड्याला ।। जी ।। कां फितुर होता लोकांला । देशाच्या पिता हो रक्ताला । आईच्या फास नरडिला । लावुनी मारतां मातृभूमीला ।। जी ।। कां गहाण टाकलं विकल बुद्धिला ।। जी. ।। कशासाठीं वाचता तुम्ही इतोहासाला ।। जी ।। कां नंदिबैल बनुन जातां तुम्हीं शाळेला ।। जी ।। एम्. ए बी. ए. होताकां गुलाम बनण्याला ।। जी ।। या पहा उघडा डोळ्याला । इंग्लड आदि सर्व देशाला । घेति ते स्वदेशि वस्तुला । विलायते वरूनि आणति सर्व कपड्याला ।। जी ।।

**चाल १ ली.** घालिता कपडे विलायती । सजविता कांति । त्याचि ना खंति । तुम्हाला, हिंदु कशास झाला । जर असेल लाज चित्ताला । आठवुनि आर्य धर्माला । व्हा उघडे बोडखे जाळा विदेशि कपड्याला ।। जी ।। रावसाहेब राव बहादरांनो । धर्म भक्तानों । गिता भक्त नो । फुकाची गीता पठण करितां । वर्तनीं आत्मघात करितां । देशाला देता बूट लाथा ।। जी ।। हिंदु धर्म नाहिं देव घरांत । नाहिं देवळांत । नाहिं स्वर्गांत । खरे हिंदुत्व कर्म योगांत । चैनबाजि नाहीं हिंदु धर्मात । खरें हिंदुत्व आत्म त्यागांत ।। जी ।। ही पहा भयंकर होळी आज पेटली । लोळे लाल झाली । विलायति कपडे फेका हो त्यात । पापाचा बळि द्यावा यज्ञांत । पुण्य धर्माचें ध्योव पदरांत ।। जी ।। [चाल ब.] होळिचे वृत जवा कळले प्रोफेसर साहेबाला ।। जी ।। विनायक होता होळीचा पुढारी झाला ।। जी ।। हाक मारली तात्यारावाला । प्रिन्सिपाल

बोलु लागला । काय धुमाकुळ सुरू केला । कॉलेजाच्या अब्रूचा बळि होळी मधें दिला ॥ जी ॥ काय बुद्धि नाहिरे तुला । काय पोरा करिसी तूं चाळा । जाउदे पेटुदे देश जळूंद्या त्यांला ॥ जी ॥ हे शब्द एकुनीं तात्या लालेलाल झाला ॥ जी ॥ क्रोधाग्नि तात्या रावाचा भडकुनि गेला ॥ जी ॥ तात्या बोलला प्रोफेसर साहेबाला । काय सांगता तुम्हिं हें मला । सर्वा अधिं देश धर्म हो प्यारा मज झाला ॥ जी ॥ तुम्हि आमचे गुरुजिना झाला । जाळायाला सांगता देशाला । जिवाहुन प्यार देशला । इतिहास सांगता अम्हाला । अन् शिकविता तुम्हिं कीं शिवबानं संभाजिनं दिला देह देशाला ॥ जी ॥ पेशव्यांनि देशधर्मार्थ प्राण अर्पिला ॥ जी ॥ अन् आज देश जाळायला सांगता अम्हाला ॥ जी ॥ ठोठावला दंड गुरुजिंनीं तात्यारावाला ॥ जी ॥ देश सेवा बांधली खरि तात्यारावाला ॥ जी ॥

## पंचम--किरण

**चाल ५ वी.** अभिनवभारत सभा स्थापिली तात्यारांवांनि नाशकांत । भरत खंड इंग्लंड भोवती फोफावलिती विख्यात ॥ जी ॥ दोनशें विरहा राष्ट्रसिंह ते नाशिक शहरामधिं आले । शपथ घेऊनी निजरक्ताची परत स्वगृही गेलें ॥ जी ॥ मातृभुमीचें दास्य विमोचन अेकमेव हें ध्येय खरे । शपथ लिहोनी द्यो रक्ताची ध्येयासाठी मरण बरे ॥ जी. ॥ जगणें येणें मरणें जाणें ध्येय हेंच कां जिवाचें । कोल्हिकुत्रि किती येति जाती सार्थक हें कां जन्माचें ॥ जी. ॥ तानाबाजी वीर शिवाजी कशासाठिं हो ते मेलें । लक्ष्मीराणी प्रतापराणा देशासाठिं हो मेलें ॥जी॥

**चाल १ ली.** स्वातंत्र्याचि तेवती जोत । न्यावि फिरवित । अखंड जगतांत । वाटले तात्यारावास अजला । मनामधें त्यांनीं निश्चय केला ॥ जी ॥ [चाल ब.] जगतांत साऱ्या फिरणाऱ्या हिंपपुत्राला ॥ जी ॥ इंग्लड फरान्स जर्मनी माविल विरांना ॥ जी. ॥ जावोनी द्यावा मातेचा संदेश हो त्याला ॥ जी. ॥ ही ज्योत तेवती एकदां दावावी त्याला ॥ जी. ॥ विनवावें सर्व विराला । बाबानो पहा ज्योतिला । दास्याच्या आचशत्रुला । व्हा पुढे तेवती ठेवा रक्षा ज्योतीला ॥ जी. ॥ शिवबानें ज्योत लावली । जीवाची वात हो केली । रक्तानें तिजला फुलविली । मावळ्यांनिं देहरक्तानें तिला जगविली ॥ जी. ॥ राष्ट्राचि अमरजोत ही आजवरि आली ॥ जी. ॥ रक्ताचें तेल नाहीं तिला विझत चालली ॥ जी ॥ व्हा पुढें भरतपुत्रांनो मंदावुनी गेली ॥ जी ॥ द्या तेंल आपुल्या रक्ताचें विझतचालली ॥ जी. ॥ घेओनि स्वा रिती ज्योत विलायतेला गेली ॥ जी ॥

**चाल १ ली** विरहानें व्याकुळ झाला । दु:खि मित्र झाला परंतु लागला । तात्याराव बोलले कायत्याला शांत चित्तानें अेका त्याला ॥ जी ॥

**चाल ६ वी** बा मित्रा व्याकुळ होसो । तव देह वृथा शिणविसी ॥ परतुनि तूं येथुनी जाशी । कर्यव्य विसरुनी जाशी ॥ चालले तुझें हे मित्र । भोंवती पहां हें चित्र । होंसिकां वृथा मनींत्रस्त । त्रासवुनी जीवां वेसो । तव देह वृथा शिणविसी ॥ जी ॥ होइल दु:खि तवआइ । दु:खानें व्यकुळ होई ॥ शोकातूर होइ तव आइ । विरहानें मोहुनी जाइ । उमगतें सर्व हें कांहीं । तिळमात्र ही खोटें नाहीं ॥ पण आईची

ही आई । दास्यांत रुतुनिया जाइ । पीडनें व्याकुळ होइ ।। अकना अैक आक्रोश । कानाचे उघडुनी कोश ।। जी ।। हे गोरे येथें बसलें । लांबोनी किती बघ आलें ।। कष्ट दुःखभोगुनी सारे । शौर्यानें विजयी झाले साम्राज्य अधिपती बनले । विश्वांत कुबेर ते झाले ।। निजआइ केली राणी । टाकले विश्रमोंहोनीं ।इंग्रजी शुर विरानी । बघ मित्रा उघडुनी डोळे । हे गेरे येथें बसले ।। जी. ।। [ चाल ब. ] परदास्या पंकीं अडकली । हैराण झाली । नाहीं कोंण वाली । तुझ्या विन उठ राष्ट्रतरुणा । स्मरुनिया आपुला शूर बाणा! मराठें शाहिचा शूर राणा ।। जी ।। न्याहळून पहा मात्रभूला । मृत्युचि आली आहे कळा । तुडविती विदेशी लोक तिजला । माञ्यानं रे जीवहैराण झाला । आई बघ पडली धरणीला । विधर्मी ओढुनी नेली तिजला । तिच्या भोवति होति गोळां ।तिच्यारक्ताचा करिति काला । पिवुन शान लालवुंद झाला । अन् आर्य भूच्या लेकरांना । भाकरिचा तुकडा खावयाला । मिळेना, काळा ठिक पडलां । तो हि हैराण बहुत झाला । भुकेने जीव व्याकुळ झाला । बघ काहीं लाज वाटे तुजला । आइ भाऊ चालल्याती स्वर्गाला। उठ बघ जाग कर्तव्याला । सोडुनिरे धार्जे पंढ गिरिला । अकव दादरे दादारे जीरजी ।। जी.।। [ चाल ब ] तात्यांरात्र ज्योत घेऊनी इंग्लडांत आले ।। जी. ।। पंडतजीच्या भारतभुवनांत येउन राहिलें ।। जी ।। संस्थेनें जाळें पसरुनीं सर्व व्यापिलें ।। जी. ।। किती क्रांति वीरांशिं त्यांचें बोलणें झालें ।। बाँबशास्त्र क्रांती कारकांनि त्यांना शिकविलें ।। जी. ।। संमिश्र कांतिकरण्यांचें ठाम हो ठरलें ।। जी. ।। परआड विघ्न संतोषि

दैव हो आले ॥ जी ॥ ती अमर ज्योत घेऊनि दिगन्ति गेले ॥ जी ॥ तेजस्वि दिव्य शद्बांनीं तरुण ओढले ॥ जी ॥ बहुविध करुनि चळवळी कार्य साधलें ॥ जी॥ [ चाल ब. ] मुत्सद्दि क्रान्तिविर, खरा भारता था हिरा । राष्ट्र रवि खरा । धन्य विर तात्याराव सरदार । मायभू दास्य-मुक्त करणार । अजरामर तिन्ही लोकीं होणार ॥ जी. ॥

# षष्ठ-किरण

पेटली क्रातींची चिता । भडकली अतां । क्रान्तिदेवता । धाडिलें तिनें क्रान्तिविर राष्टांत । विरांनि बळी घेतलें । किति दुष्ट शत्रु मारिलें । देविचे चरण रक्तांनीं त्यानी पूजिले ॥ जी. ॥ [ चाल ब. ] बंगाल्यात अमदाबादेला स्फोट किती झालें ॥ जी ॥ बॉंबगोळ्यान ईंग्लडअधिकारी ठार मारलें ॥ जी. ॥ उलथून टाकुनी गाड्या शत्रु मारलें ॥ जी. ॥ धिंगरानें लालकाकाला पाणिपाजिलें ॥ जी ॥ किती भक्त क्रान्तिदेविचे सुळावर गेलें ॥ जी. ॥ लोकमान्य अण्णाराव बाबाराव अडकलें ॥जी.॥ कंसांनि कितीक कृष्णास आंत कोंडले ॥ जी ॥ [ चाल ब ] अरेकंसा कितिक कोंडणार । हजारो जन्म घेणार । क्रान्ति विरयेणार । तुझ्या नरडीचा घोट घेणार । क्रान्ति देविची पुजा करणार । तुझा बळी तिच्या चरणीं वाहणार ॥ जी. ॥ पापाचा घडा भरणार । खचित फुटणार । कधिंन चुकणार । क्राति विरांचा गराडा पडणार । तूं सज्ज रहा क्रान्तिला । उपाय नाही त्याला । खचित येणार । तुझ्या बापाला नाही चुकणार । आज सत्ता आहे हातात । म्हणुन मोजलास । ठेव ध्यानांत । उद्यां क्रान्तिचा फेरा येणार । पापिहात तुझे घेउनी ।

नरडिला तुझ्या लावुनी । रक्ताचा पाट फोडोकी । ति क्रान्ति देवी नरडिचा घोट गिरणार ॥ जी. ॥ [ चाल ब ] दिलीशिक्षा काळे पोण्याचि बाबारावांना ॥ जो ॥ हो बातमि कळली ते वेळां साऱ्यालोकांना ॥ जी ॥ नाशकांत संस्थेच्या साऱ्या शूर विरांना ॥जी.॥ [चाल ब] क्रोधाग्नि भडकुनी गेला । लालेलाल झाला । करावा हल्ला । कलेक्टरांवरति ठरले हो खांस । लागला हाच ध्यास सर्वांस । संस्थेच्या सर्व शुर विरांस ॥ जी ॥ ते क्रांन्ति सिंह अेकत्र गोळा हो झाले ॥जी॥ ध्येयाच्या पूर्ततेसाठीं देह अर्पिले ॥ जी ॥ [ चाल ब ] अेकवीर उभा हो राहिला । तो बोलला सर्व तरुणाला । तरुणानो झोपी काय गेला। आग लागली खालति पायाला । सारा देश गुलाम बनविला । काय लाज वाटेना तुम्हांला । बूट लाथा मारती आपणाला । किति जुलूम तुमच्यावर केला । अन्याय अत्याचाराला । तुम्हीं सहन करतां सर्वाला। अरे साधी मेंढी मारी आपुल्या शत्रुला ॥ जी ॥ अरे साधा पक्षी कधी ना करी सहन जुलुमाला ॥ जी ॥ लोकमान्य आमुचा नेला । आण्णांना जबर शिक्षेला । काळपाणी दावल बाबाला । झाले सारे जुलूम सिंहानो सहन तुम्हाला ॥ जी ॥ ध्यायाचा सूड जुलूमाचा ठरलें ते वेळां ॥ जी ॥ आपुल्या रक्तान लिहून दिल वचनांला ॥ पडणार बळिन लोंभाला आर्पि प्राणाला ॥ जी ॥ नाहो क्रांतीवीर होणार फितूर शत्रुला ॥ जी ॥ आलि होती नाटक मंडळी नाशिक शहरोला ॥ जी ॥ जायचा होता साहेब दुसऱ्या गांवाला ॥ जी ॥ बदलून जॅक्सन साहेब दुसऱ्या जिल्ह्याला ॥ जी. ॥ हे वृत्त कळल शहरात रात्र साहेबाला ॥ जी ॥ मॅनेजरानीं विचार तवा केला । बोल-

बाबा साहेब नाटकाला । पा सुपारी द्यावी साहेबाला । खुष करावं गोऱ्या साहेबाला । गोरा आर्शिवाद मग मिळेल खास कंपनिला ॥ जी ॥ असा विचार येऊनी दिले निमंत्रण त्याला ॥ जी॥ साहेबानें मोठ्या आनंदान स्विकारलं त्याला ॥जी॥ आप खुशीनं विषाचा प्याला हाति घेतला ॥जी॥ परीक्षित राजान घेतल हातात बोराल ॥ जी ॥ क्रांति त्वर तेथें बैसला काय ठावे जॅक्शन साहेबाला । नाही कळल जीव नाशाचे बीज त्याला ॥ जी ॥ १९०९ हो सालाला । डिसेंबरच्या एक विस तारखेला । रात्रींज्यां घोर समयाला । नाटकाला रंग हों आला । गोरा साहेब खूष हो झाला । त्याला वाटल आलोय स्वर्गाला । शारजा पाहुन साहेब बेहोष झाला ॥ जी ॥ पाहोनी आप्सरा खाली मोडूनी गेला ॥ जी ॥ त्या रात्री शारदेला फार रंग हो आला ॥ जो ॥ [ चाऊ ब. ] रंगांत झाला बेरंग । झाली पांगा पांग । जिवाचा भंग । जाहाला जॅक्सन साहेबांचा खास । कान्हेऱ्यांनीं धाडल त्याला स्वर्गास । बळी वाहोला देवी चरणांस ॥ जी ॥ सिंहाने धरीलें सावज । झाला आवाज । कडाडली विज । चमकुनी घुसली साहेबाच्या काळजांत । काळीज फोडुनि । रक्त शोषूनि । गेली पाताळांत । फेकला प्राण वरति स्वर्गात ॥जी॥ कान्हेऱ्यांनी कोपऱ्या मधून बार झाडला ॥ तों क्रातीं बार साहबाचें वर्मि लागला ॥ जी. ॥ पाही वळून मागच्या बाजूला । कीं आवोज कोठूनीं आला । कोण मारतों गोऱ्या साहेबाला । वटारुन डोळें पाहीतो मागच्या बाजूला ॥ जी. ॥ धाडधाड आवाज जाहला पडला धरणिला आवरुन जिवाचा खेळ स्वर्गला गेलाजी ॥ जी. ॥ चोहिकडें

माजुनीं सारा गोंधळ हो गेला ।। जी. ।। पोलीसांचा घोळका आलो । त्यानीं लावल सर्व दाराला ।। कोंडोनी ठेवल लोकांला। जारिनें शोध सुरू झाला । कोणाच्या पहाती कोटाला । फाडोनी पाहाती सद्ऱ्याला । काढोनि बघती टोपीला । दर इंचा गणिक सिंहाचा शोध सुरु झाला ।। जी. ।। इतक्यांत कोपऱ्यां मधुन सिंह गर्जेला ।। जी ।। अहोपोलीस अहोपोलीस पहाता कोणला। जो सिंह शोधतां तुम्हीं येथ बैसला ।। जी. ।। मी माझ्या हातान मारल जॉक्सन साहेबाला ।। जी. ।। ह्या तिक्ष्ण पंजान माझ्या फाडल त्याला ।। जी. ।। झालें कार्य आज हें पुर्ण पकडाना मला ।। जो. ।। शुद्धित पूर्ण मी आहे घेतलं सुडाला ।।जी ।। मी क्रान्ति देवीच्या चरणी बळी वाहिला ।।जी।। पांपोचा भरलेला घडा पार फोडला ।। जी ।। लोकमान्य आमुचा नेला। काळ पाणि दावलं बाबाला। अण्णानां जबर शिक्षेला। सांगाव किती जुलमाला। जुलुमाचा पुरेपुर सूड आज घेतला ।। जी ।। आज क्रांति देविचा हेतु सफल झाला ।। जी ।। पोलिसांनि वेढुनी टाकलं क्रांतिवीराला ।। जी ।। अन्यायाच्या जगा मधि कोण पुसतो न्यायाला ।। जी ।। देवाची अशी ही लीला ऊपाय नांहीं त्याला ।।जी।। अन्याय म्हणावे काय दिसेना देवाला ।। जी ।। जगतांचा त्राता तो देव अन्यायी झाला ।। जी ।। देशपांडे कान्हेरे आणिक दिलें फांशिला ।।जी।। धन्य धन्य अनंत कान्हेरे। क्रांति वीर खरे। राष्ट्राचे हिरे। चमकुनी तिन्ही लोकि जाणार। दुम दुमुनि कितीनाद जाणार। सारे जग कितीं तुझी गाणार ।। जी ।। स्वातंत्र देवीच्या चरणी। देह झिजवोनी। प्राण

# केशसौंदर्याची पुनः प्राप्ति



अकालीं केस पांढरे होणे, टक्कल पडणें, केंस गळणें, दृष्टि मंद होणें इत्यदि विकरांवर मुकुल हेअर ऑइल हे त्वरित गुणदायक आहे.

## मुकुल

## आयुर्वेदाश्रम फार्मसी ली. अहमदनगर

मुंबइ शाखा :— कांदेवाडी नाका, गिरगांव मुंबई

# भिषग्विलास

## मराठी वैद्यक वाङ्मयांतील सर्वश्रेष्ठ मासिक

वाचा व आपल्या वैद्यकीय ज्ञानांत भर घाला!

**नविन व्यवस्था! -❀- सर्वांगीण सुधारणा!**

— दरमहा सहा तारखेस न चुकतां प्रसिद्ध होतें! —

लेखकः– वैद्यपंचानन गंगाधरशास्त्री गुणे. वैद्यराज डेग्वेकर *M. A. M. Sc. LL. B.* [ जबलपूर ] प्रो. ग. स. दीक्षीत *M. A.* वैद्य विंदुमाधवशास्त्री पंडित, वैद्य वि. म. गोगटे डॉ. अ वि. केतकर *M. B. B. S.* श्री. शि. पा. जोशी M. *Sc.*

विषयः—रोगनिदान, शास्त्रिय चिकित्सा पद्धति, नाडीपरिक्षा त्रिदोषविज्ञान, आयुर्वेद शास्त्राचा पाया, औषधीकरण पद्धतीचें संशोधन, कॉलरा मलेरिया, सन्निताप इत्यादी रोगांची अनुभविक चिकित्सा, वैद्यकांतील नव शोध इत्यादी.

निवडक रुग्णचिकित्सा हें सदर आयुर्वेदाचे अभ्यासक व व्यवसायी अत्यंत अवडीनें वाचतात.

पत्ताः— व्यवस्थापक 'भिषग्विलास'

**अहमदनगर**

अर्पोनी । गेला कान्हेरे वरति स्वर्गाला । ललामभुत झाला हिंदुराष्ट्रास । प्रणाम हा करो शाहिर हो त्यास ॥ जी. ॥

# सत्पम-किरण

धर्नार्थि माय भूपदी लीन जोझाला । ऐश्वर्य वाहिलें सारे मायभूमिला । तोधन्य धन्य नरवीर कीर्तीयुत होई । इश्वर त्या वरि संतोषला ॥ जी ॥ १९०९ सालांत । बॅरिस्टर परिक्षेत । झालि बिलायतेंत । यशस्वि हो झाले तात्याराव त्यात । जयानें घातली माळ कंठांत । पाडलीभर त्याचें किर्ती नादांत ॥ जी. ॥ [ चाल ब. ] ग्रेन अिनच्य बैठकी मध्यें मोर्ले बोलला ॥ जी ॥ देऊ नका सनद वकिलीची विनायकरावाला ॥ जी ॥ हा पुंड करितो कारवाया राज द्रोहाला ॥ जी ॥ पुढें ठेवलं मोर्ले साहेबान कागदि पुराव्याला ॥ जी ॥ ग्रेन अिननें निकाल मग दिला । कीं जर तात्याराव घेतिल शपथेला । कीं सोडीन राज्यद्रोहाला । अर्पिन स्वतःचा देह राजनिष्ठेला ॥ जी ॥ निष्ठेन अंग्लराज्याच्या करिन सेवेला ॥ जी. ॥ तात्याराव काय बोलला । लाथ मारतो असल्या सनदेला ही सनद घेउनी जाऊ कसा देशाला ॥ जी. ॥ पेटवू कसा मी स्वतः राष्ट्रधर्माला ॥ जी. ॥ लावुनी फास नरडीला मायभूमीला ॥ जी. ॥ धाडु मी मातृभूमिला घोर नरकाला ॥ जी. ॥ [ चाल ब. ] ही सनद कशी मी घेऊं । देशनाश कैसा पाहू । देशाविन कोठें जाऊ । हिंदु सूर्य कोटें पाहू ॥ देशाविन झाडें जळती । मुंगि कीट प्राणी मरती । निर्देश कोणीना जगती । देश नाश कैसा पाहू । ही सनद कशी मी

घेडं ॥ मला नको सनद ती तुझी । तुझ्या दास्याचि । देशद्रोहाची । एक मला देशधर्म रे प्यार । एक मला आर्य माता ती प्यांर । तिच्या स्तव देह माझा झिजणार ॥ जी. ॥ अन्यायाचा सूड घेतला । लाल- काकांला । कर्झन वायलिला । मदन लालनं धाडल स्वर्गास । अजरा- मर वीर झाला जगतांत । पसरली किर्त साऱ्या विश्वांत ॥ जी .॥ धन्य विर धिंगरा मदनलाल । भरताचालाल । देशधर्म पाल । अन्या- याचा बळी दिला देवास । अर्पिला देह देश धर्मास ॥ जी. ॥ [ चाल ब. ] हे कृत्य अैकुनीगार अगाखान झाला ॥ जी. ॥ वाटली भयंकर भिती त्याचे चित्ताला । की साहेब येऊनी मारिल खस्त : आपणाला ॥ जी. ॥ अन्याय कारस्टानें केला । देहभान धिंगरा विसरला । आग लावली त्यानं देशाला । पेटविली होळी त्यान त्यांत लोटल अम्हाला ॥ जी ॥ शान्तवू कसा मी अतां गोऱ्या साहेबाला ॥ जी ॥ शान्तवू गोऱ्या देवाच्या कसा मी क्रोधाला ॥ जो. ॥ चिंतेनें व्याकूळ झाला । एक युक्ति सुचली खानाला । बोलवावें हिंदि लोकाला । मांडाव सभेत ठरावाला । हळहळ वाटते साऱ्या हिंदि लोकाला ॥ जीं ॥ धिंगडान मुर्ख पणा केला । त्यनं मारल गोऱ्या सोहेबाला । हिंदिच्या माय बापाला । बेभान पोरटे वेड लागलें त्याला ॥ जी. ॥ [चाल ब ] बोलावल हिंदि लोकला पुढारी स्थान झाला । मांडिल ठरावाला । निषेध आम्हीं करतो धिंगराचा हो खास । दु:ख फार होतय हिंदि लोकांस कृपा दावावी राजान आम्हास ॥ जी. ॥ [ चाल ३ री ] सभे मध्यें खान उभाझाला । त्यांन माडल निषेध ठरावाला । बोल-

लागला साऱ्या लोकांला । सर्वानुमतें हा ठराव पास हो झाला ॥ जी. ॥ कोणाचा असें कां विरोध अशा ठरावाला ॥ जी. ॥ विचारलें खानानें तेथ साऱ्यां लोकांस ॥ जी. ॥ इतुक्यांत कोपऱ्यां मधुन सिंहनाद झाला ॥ जी. ॥ अहोमहाराज सर्वानुमतें हा ठराव पास नाहीं झाला ॥ जी. ॥ माझा विरोध आहे ठरावाला । दुष्कृत्य काय त्यांन केल सांगाना मला ॥ जी. ॥ अन्यायाचि चिड आली त्याला । त्यांन घातल्या गोळ्या साहेबाला । अपमान कोणि कोणाचा काय हो केला ॥ जी. ॥ त्यांन मारल गोऱ्यासाहेबाला । साहेब नाहीं अजुन बोळला । कां करितां उगिच बोलबाला । काय पुळको आला तुम्हाला । धनिनाहीं दाळीत अश्रुला । बिऱ्हाडानीं फुकाचा बोबनाद सुरुकेला ॥ जी. ॥ हे शद्व एकुनी खान चवताळून गेला ॥ जी. ॥ भावनगरि लोकांनीं साथ दिलिहो खानांला ॥ जी. ॥ कोण म्हणति लाथ मारुनी हुसकवा त्याला ॥ जी. ॥ कोण कार्टानीच पोरटा धुंडाळा त्याला ॥ जी. ॥ पोलीस पोलीस पकडूनी नीच पोरटा धाडा तुरुगाला ॥ जी. ॥ सभेमधें काळा कावळा कशाला अला ॥ जी. ॥ तात्यावीर शांतगंभिर उभा राहिला ॥ जी. ॥ तो धैर्य मेरु रणधिर अचलराहिला ॥ जी ॥. अहो खानसाहेब कुणाला धूडाळतां हा पहा इथें मी उभा पकडाना मला ॥ जी. ॥ हाणा मारा ठोका शद्वांचा गिल्ला सुरु झाला ॥ जी. ॥ [ चाल १ ] आला पहा दैवाचा घाला हाय घात झाला । ठोसा लगावला अर्ध गोऱ्या साहेबान हल्ला केला । खान बहाद्दर तुष्ट झाला ॥ जी. ॥ एक ठोसा मारला त्यानं वर्मात कपाळाला ॥ जी. ॥

भाव नगरि लोकांनि धरल धैर्य मेरुला ।।जी।। एक ठोसा मारलो कपाळाला । एक गुद्दा हाणला डोळयाला । कपाळांतुन रक्ताचा प्रवाह वाहु लागला ।।जी.।। डोळयास मार लागला । अन् काचेचा चष्मा विच्छिन्न होऊनी गेला । घातलं लालरक्तान स्नान तात्याला ।। जी. ।। तो क्रान्ति वीर ध्रुव जसा अढळ राहिला ।। जी. ।। [ चाल १ ] करातुकडे तुकडे देहाचे । पाट रक्ताचे । वाहूदे जिवाचें । विरोध निषेधाला पूर्ण करणार रक्ताचा थेंब हेंच वदणार ।। जी. ।।

## अष्टम--किरण

राष्ट्राच्या मुक्तते साठिं घोर दुःखांना । कितिभाव सोसिसी नाना घोर यातना । सामर्थ्य गावया नाहीं किर्ति शद्बांना । म्हणूनियो शिर हें नमवुनि । चरणि लावोनि करिमि वंदना ।। जी. ।। कान्हेऱ्याच्या फांशिचें वृत्त कळलें तात्यांला ।। जी ।। देशपांडे कान्हेरे आणि कर्वे दिलेत फाशिला ।। जी. ।। व्देशाग्नि सरकाराचा अतां भधकुनी गेला ।। जी ।। झडत्यांचा कहर सुरू झालाचोहोबाजुला ।। जी. ।। संशयाच्या भुतान धरल गोऱ्या साहेबाला ।। जी. ।। दिली गती भुतानें जोरांत विचार चक्राला ।। जी. ।। चक्रानें छेडींलें साऱ्याघोर कृत्याला ।। जी. ।। साहेबास गुप्तक्रान्तीचा वास लागला ।। जी. ।। वासानें पूर्ण उन्मत्त केल साहेबाला ।। जी ।। काढिलें छळुनि लोकांस सीमा नांहीं त्याला ।। जी ।। किती पडले त्याच वेळेला बळी जुलमाला ।। जी ।। अन्यान कितीक लोंकानि सहन हो केला ।। जी ।। जणु आला भस्मासुर सारा लोक जाळायला ।। जी ।। बकासूर आलाय गांवात लोक

खाण्याला ॥ जी. ॥ कृष्णाचा वास लागला गनिमी कंसाला ॥ जी.॥ तो कृष्ण फिरवि लांबून क्रान्ति चक्राला । तात्याराव होता परदेशी ह्यांच वेळेला ॥ जी ॥ ही बातमी पॅरिस शहराला ॥ आली कळली तात्यारावाला । कान्हेऱ्यांनी मारल साहेबाला । अभियोग त्याचा सुरु झाला । बळी पडले क्रान्ति विर किती दैत्य रोशाला ॥ जी ॥ कांहीं सुचेंना तात्यारावाला । धड राहिल पॅरिस शहराला । पर आत्मा अडुन हो गेला मातृ भूमिला ॥ जी. ॥ पाहोनी परिस्थिती सारिवेगें परतला ॥ जी. ॥ जशी वीज स्वर्गातुन येतें मृत्यु लोकांला ॥ जी. ॥ मग बोलले तात्या लालाला । आता जातो परत देशाला । ती पहा भयंकर होळी देशालां ॥ जी ॥ तो पहा भयंकर सिंह टाकि झडपेला ॥ जी. ॥ व्याकूळ होऊनी फोडि जननी हंबरडा ॥ जी. ॥ कोलियानें गिळून टाकिलें कितिक भावाला ॥जी.॥ फुत्कार सोडोनी नाग धावुनी गेला ॥ जी. ॥ सहकारि बंधु आणि शिष्य चढलें फाशिला ॥ जी. ॥ हालहाल करित तें त्यांचें छळिती विराला ॥ जी. ॥ काया जाळू क्रान्ति धर्माला । बेइमान होउ देशाला । बळी पडुन कितिक मोहाला । जननिच्या फास नरडिला । आइच्या फोडुन काळजाला । कसा पोसु आपुल्या देहाला । कांहीं लाज नाहीं का चित्ताला । देशबंधु चालले स्वर्गाला । कसा राखु आपुल्या जिवाला ॥ जा. ॥ देइल शाप संभाजी स्वर्गातुन मला ॥ जी ॥ रणविर शिवाजी राणा पुसेल हो मला ॥जी.॥ अर्पिन स्वतःचा देह क्रान्ति धर्माला ॥ जी. ॥ जर जगलों वाचलो तर

साऱ्या भोगिन भोगाला ॥ जी. ॥ जर मेलो घेउन जन्माला येइन जगतांला ॥ जी ॥ त्याक्रान्ति देविच्या सफल करिन हेतुला ॥ जी ॥ सेनापती राहिलका कधीं लपुन पिछाडिला ॥ जी. ॥ सैन्याला मारुनीं कसा राखु जिवाला ॥ जी. ॥ सेनापती रणक्षेत्रांत जाई आघाडिला ॥ जी. ॥ असं म्हणून तात्याराव विर चालु लागला ॥ जी. ॥ पॅरीस सोडून चालला वीर लंडनला ॥ जी. ॥ [ चाल १ ] काळाच्या घोर जबड्यांत । आगडोंबांत । यज्ञ ( मृत्यु ) कुंडांत । घेतली उडी क्रान्ती यज्ञांत । सतीचें वाण घेऊन हातांत ॥ जी ॥ मित्रास प्रणाम करूनिया चढले बोटींत ॥ जी. ॥ तात्याविर बोलले मित्राला । सुरु ठेवा क्रांतिं कार्याला । रक्षाव अमर ज्योतिला । आम्हि जातो अमुच्या कार्याला भारत वर्षाला ॥ जी ॥ पाहुद्या क्रान्ति भक्तांचे सत्व देविला ॥ जी. ॥ इंग्लडच्या लागली क्रान्ति बोट बंदराला ॥ जी. ॥ मारुनी सुखावरी लाथ तानाजी गेला । धर्माच्या रक्षणा साठिं देहबळी दिला । तात्याराव आले गाडिनं लंडन शहराला ॥ जी. ॥ जायाचा बेत त्यांचा होता भारत वर्षाला ॥ जी ॥ [ चाल १ ] पण आलो देवाचा घाला । सिंह अडकला । काळाच्या घोर विराट जबड्यांत । लिहिलेल कसें टळेल नशिबांत ॥ जी. ॥ ठेपली येऊनी गाडी लंडन स्टेशनला ॥ जी. ॥ पोलिसांचा घोळका आला गराडा पडला ॥ जी. ॥ देऊनी गराडा त्यांनीं घेरल तात्यांला ॥ जी. ॥ येथेंच उतरा यथेंच बोललें त्यांला ॥ जी. ॥ ब्रिस्टनच्या कारागृहीं ठेवल कोंडुनि सिंहाला ॥ जी. ॥

# नवम--किरण

वमाजिळाला हरदयाळ राणा फ्रान्सांला ॥ जी. ॥ त होते कोठीमधिं दावा सज्ज आणायला ॥ जी. ॥ म्हणून विचार सरकारानं केला । टाळयच राष्ट्र बंदराला । एडनला न्यायच नाही त्याला । बिस्केच्या मार्गेन न्याव त्याला देशाला ॥ जी ॥ सोजिरांचा पहारां भोंवति सज्ज जाहाला ॥ जी. ॥ दैवानें दिली हो गती आगबोटीला ॥ जी. ॥ ती आगबोट चालली आपुल्या मार्गाला ॥ जी. ॥ तुडवित जलधि ध चालली घेऊन विराला ॥ जी. ॥ तात्यांनीं विचार काय केला । तुरि द्यावि हातांत शत्रुला । जिरवाव आपुल्या वैऱ्याला । गाजवाव सिंह शौर्याला । तुरी देउन शिवाजी राणा निसटुनी गेला ॥ जी. ॥ भगवंत फसवुनी गेला दुष्ट कंसाला ॥ जी. ॥ त्याच्यापरि प्राणदात्याचें साऱ्या जगताला ॥ जी॥ पुरुषार्थ करांवा कांहीं ह्याच जन्माला ॥जी॥ दावावि चमक राष्ट्राचि सर्व जगताला ॥ जी. ॥ असा विचार मना-मधिं करून स्वस्थ बैसला ॥ जी ॥ तो सिंह न्याहळी भवताला आपुल्या संधीला ॥ जी. ॥ नशिबानें तात्याच्या हात दिला वीराला ॥ जी. ॥ ती बोट आलि दैवान मार्सेलिस बंदराला ॥ जी. ॥ अंकूर आशेचा चित्तात उगवुनी आला । येथेंच आपुले सहकारि येतिल सहाय्याला ॥ जी. ॥ होत कोंडल खोलिंत विराला । चौफेर पहारा बैसला । उपसून तीक्ष्ण शस्त्राला आतां काय युक्ति योजावी सुचेना त्याला ॥ जी ॥ आठवल शिवबादादाला । वंदिल पूज्य देविला । तेज स्फुरकि.

रनें दिला प्रकाश विराला ॥ जी. ॥ एक युक्ति सूचली तात्याला । पहाटेच्या योग्य वेळेला ॥ जी. ॥ विचाराव अपुल्या पहाऱ्याला । कीं बाबा लागली शौचाला । निसटून जावे जोगेला । शिवबाच्या गनिमि काव्याला दावाव दुष्ट लोकांना । देवोंन हातावर तुरी फसवावे त्याला ॥जी. ॥ जाहला खूप आनंद क्रान्ति विराला ॥जी.॥ परकाहो सूचना बघा त्याला । हाक मारली प्रभात कालाला । विनविल नम्रभावान उषा देवीला ॥ जी. ॥ देवीन विनंति अैकलि आलि वेळेला ॥ जी. ॥ तात्यावीर बोलला शिपायाला । दादानो लागलि शौचाला । कृपा करुन न्याव हों मला शौच स्थानाला ॥ जो. ॥ जाग केल सर्व संत्र्याला । त्यांनीं घेरलं तात्यारावाला । संत्री चालले शौच स्थानाला । उघडोनी दार तो वीर आंत हो गेला ॥जी॥ कांचेचि दार कुपाला । बाहेर संत्री पाहाऱ्याला । तेथुन बघती तात्याला । आंत सिंह आहे कां गेला । ह्याचि लागली चिंता कंसाला । फाड फाडुन डोळे पुन्हां पुन्हां बघती ते त्याला ॥ जी ॥ संत्र्याचे फाटले डोळे अैन वेळेला ॥ जी ॥ बाटो-ळी वर्ति हो खिडकी शौच कुपाला ॥ जी॥ तेथुन मराठे शाहिचा बच्चा निसटला ॥ जी ॥ साबु लावला सर्व अंगाला । लंगोट कसला कमरेला । गंजिफ्राक घातला अंगाला । केला प्रमाण क्रान्तिदेविला वंदोनि राष्ट्र-झेंड्याला । झगा काळा लावला दाराला । सत्र्यांच्या ढापण डोळ्याला लावोनि । काळ्यो डांबराला । चढुनिया खिडकींतुन पारक्रान्ति विर झाला ॥ जा ॥ स्वतंत्र्य लक्ष्मिचा घोषनाद सुरु झाला ॥ जी. ॥ राहुच्या मिठीं तुन सूर्य मुक्त हो झाला ॥ जी. ॥ तो कृष्ण कंसाच्या हांतुन

निसटला ॥ जी ॥ क्याकरतां है रे तू अंदर संत्रि बोलला ॥ जी. ॥ सरसरा भिंतिचढूनिया खिडकीवर गेला ॥ जी. ॥ सागरी टाकलीं उडी कृष्ण धावला ॥ जी. ॥ अरे भागा हराम खोर भागा शंख चालला ॥ जी. ॥ ती यमुना बेलती भावाला । बंधुस लाडक्या सागराला । सागरदादा विनतिरे तुला । लांबुन आले मि भेटण्याला । कृपाकरुन पूर्ण तू करी माझ्या विनतिला ॥ जी. ॥ ने पैल तिराला माझ्या कृष्ण बाळाला ॥ जी ॥ तो आला कंस मानगुी त्यास धरण्यास ॥जी. ॥ दादान होकार तवा दिला आपुल्या बहिणिला ॥ जी. ॥ तो क्रान्ति विर चालला पैल तिराला ॥ जी ॥ जगताच्या इतिहासांत जोड-नाहीं झाला ॥ जी. ॥ संत्र्यांनी फोडल दाराला । फाड फाडून मोठ्या डोळ्याला । भोवताली पाहिल तात्याला । अरे कुठे तो आहे तात्या निसटूग गेला ॥ जी. ॥ अल्ला रे अल्ला । क्या किया तुमनें यह मुझे दगा तो दिया ॥ जी ॥ बोटीवरनं पाहिल तात्याला । की तात्या चालला बंदराला । संत्र्यांनी झाडलं गोळ्याला । गोळ्यांचा वर्षाव झाला। पर एक लागली नाहीं त्याला । जर गोळी लागली अंगाला । बुडी मारुन झाकी देहाला । छातीचा कोठ त्याने केला । किती झेललं त्यांनि गोळयाला । कालीयान फेकल विषाला । कृष्णानें मारलं विषाला । यमुनेच्या दादानें राखलें वीर तात्याला ॥जी ॥ दिला त्याला अपुला देह ढाल करण्याला ॥ जी ॥ देहाचे घातलें त्यांच्या चिलखत अंगाला ॥जी॥ तो वीर कृष्ण लागला पैल तिराला ॥ जी ॥ चढुनिया सरासर शित तटावर गेला ॥ जी ॥ धरो पकडो साला बदमाष खैर किये अल्ला ॥ जी ॥

तो कंस मागुनि अला कृष्ण धरण्याला ।। जी ।। तात्याराव वायु वेगानें धावुं लागला ।। जी ।। तात्याचा कंसानीं पाठलाग सुरू केला ।। जी ।। ओकॅव्र आयूत्रॉट कॅब ! अरडा करित तो क्रांति वीर चालला ।।जी।। फरेचांनीं धरलं तात्याला। तात्यावीर त्यांना बोलला । ह्या फरान्सच्या अभ्यागताला । द्याव अभय राष्ट्रवीराला । कोर्टात न्याव तुम्हि मला । इतिहास सारा सांगेन तेथ साहेबाला ।। जी ।। धरो पकडो चोर ब्रिटीशोंका काफिर साला ।। जी ।। तात्या वीर बोलला शिपायाला । फरेचाच्या हद्दी मध्यें आलो अभय द्या मला ।। जी ।। मि चोर नांहीं बदमाष ओळखा मला । राष्ट्राच्या मुक्तते सांठी वीर लढणारा ।। जी ।। मी वीर स्वराज्या साठीं देह अर्पिला ।।जी.।। मी वीर क्रांन्तिचा भक्त राष्ट्राचा खरा ।।जी.।। पैशांनि केलं ब्रिटिशांनिं फितुर फरेंचाला ।। जी ।। ब्रिटिशांच्या केले स्वाधिन त्यांनिं तात्याला ।। जी ।। फितुरीन जगांचा सारा नाश हो झाला ।।जी।। पैशांने जाळीलें साऱ्या धर्म नितीला ।।जी।। [ चाल ब. ] कुठे गेला सखा गरिबांचा अैन वेळेला । अन्याय ठार मारतों सर्व विश्वाला । तो धर्मवीर स्वर्गात झोंपी कसा गेला । काय पाप दिसेना त्याला । फितुर तो झाला । देव पैशाला ।। जी ।। पैशांच्या लोभान लाथ मारती धर्माला । देति तिलांजली लोभानें धर्म नीतीला । परि आज दृष्टिना नितीवान देवाला । कुणि नांहीं देव गरिबाला । फितुर तों झाला । देव पैशाला ।। जी. ।। झालें कोंडले एका खोलींत शूर विराला ।। जी ।। ते दुष्ट निच धमकावणि देति तात्याला ।। जी. ।। बतायेंगें तुमको आज रातको मारा साल्योला ।। जी. ।। तात्याविर

बोलला संत्र्याला । जर लावाल हात अंगाला । खबर दार घाल वासाला । बच्चाजी संभाळून रहा अपुल्या जिवाला ।। जी ।। देहाची पर्वा नाहीं मला । तळ हाती घेतल देहाला । घेवोंनि स्वतःचा देह नीघालो क्रान्तिला ।।जी।। आणिला पकडुनी विर मायदेशाला ।।१९१० सालांत खटला सुरु केला ।।जी.।। आणिलें न्यायकोर्टास तात्यारावाला ।। जी. ।। फर्मा ल साहेबान जन्मठेंप शिक्षेला ।।जी ।। न्यायाधीश तात्यास बोऊला । कांहीं सांगायचे कारे तुला । तात्यबोलला न्याय कोर्टाला । कांहीं नांहीं सुखानें भोगिन जन्म ठेपेला ।। जी. ।। काय शिक्षा मारि आत्म्याला हा शिक्षा मारिल देहाला । मी पुन्हां जन्म घेओनी येइन जगतांला ।। जी ।। हे राष्ट्रकार्य मी करिन पुढच्या जन्माला ।। जी ।। स्वातंत्र्य फुकाचे देतो कोण कोणाला ।। जी. ।। बलिदान क्रान्ति विरांचे लागने त्याला ।। जी ।।१ मी देह माझा अर्पिला क्रान्तिदेविला ।।जी।। त्या कंस दुतांनीं नेल त्याला तुरूंगाला ।। जी. ।। तो धन्य वीर पुढें गेला अंदमानाला ।। जी. ।। [ चाल ब. ] मजन्म वाहिलं देह राष्ट्रकार्यला । आपुल्या मातृभूमिला मुक्त करण्याला । संपूर्ण प्राण अर्पिले क्रान्ति देविला । तो धन्य विर जगीं झाला । प्रियही देवाला । प्रणाम हा त्याला ।। जी. ।।

## दशम--किरण

१९३७ सालाला पांचवे महिन्याला । दाहाव्या तारखेला । सूर्य ग्रहणांतुन मुक्त झाला । हिंदुधर्माचा प्रकाश पडला । रात्रींचा अंधकार

गेला ॥ जी. ॥ [ चाल ब. ] स्वातंत्र्य भांनु उगवला । स्वातंत्र्य शाहिर आला ॥ जी. ॥ तो भगवा झेंडा वर गेला । गगनांत नाचुं लागला ॥ जी. ॥ आनंदे डोलु लागला । साऱ्याजगास सांगु लागला ॥ जी. ॥ माझा शिवा संभाजी आला । भित नाहीं कुणाच्या बापाला ॥ जी ॥ चोरानो सोडा जागेला । लाडग्यांनो पळा रानाला ॥ जी. ॥ तुम्ही उपरे लांबुनी आला । अन देरल माय भूमिला ॥ जी. ॥ [ चाल ब. ] जन्मलो वाढलो येथें । उपभोग भोगिलें येथें ॥ जीवाच्यो आशा येथें । आकांक्षा रुजल्या येथें ॥ मत् स्वामी झाले येथें । शिवसंभा माझें त्राते ॥ रामदास आदि नेते । शूरलक्ष्मि बाजी जेते ॥ हिच माय भूमी माझी । पुण्य भू कर्म भूमीही । एतद्भिन दुसरी नाहीं । सोडु अवनीतल माझे नाहीं ॥ सोडुनिया कसा जाऊ । बेइमान कैसा होउ ॥ पुसतील शिवाजी मजला । सांगुकाय बोला त्याला ॥ 'बाध्वजा' त्वत् स्वार्थासाठीं मेला । तोताना आठव त्याला ॥ मावळा सोडुनी गेला । जिव लढतां लढतां मेला । देऊनी बळी देहाला । रक्षिलें ध्वजा तुम्हाला । झेलुनो जीव हा मेलो । फडकवुनी तुजला गेलो ॥ किति विर लढुनिया मेलें । जिवदान करुन गेले । त्यारक्तामधिं भिजलेलें हे शरिर कैसे पाहू । बेइमान स्वातंत्र्य सूर्य उगवोनि पृथ्विवर आला ॥ जी. ॥ तो अर्धी देइल तेजस्वि किरण आपणाला ॥जी. ॥ चातका सारिखे लोक बघति वाटेला ॥जी.॥ येऊदे मुखी अधि थेंब वाटतें त्याला ॥ जी. ॥ कांग्रेस लोकशाहि हिंदुसभा वाल्याला ॥ जी. ॥ वाटले होते तात्याराव होइल आपला

वाट पहाट दोर उघडोनी भाइ बैसला ॥ जी. ॥ नष्टवू सूर्य किरणानें हड्या रोगाला ॥ जी. ॥ बलवान करूंया पक्ष राष्ट्रामधि पहिला ॥ जी. ॥ तेजस्वि सूर्य तेजानें दिपवु लोकांला ॥ जी ॥ असं वाटल सर्व पक्षाला । पर न्यारा प्रकार हो झाला । पक्षपात सूर्य देवाने आज हो केला ॥ जी ॥ तो पण पक्षपात करि तसें म्हणावें ह्याला ॥ जी ॥ तो सूर्य कधिका करितो पक्षपातांला ॥ जी ॥ मोंकळ्या रानामधि देतो चौफेर तेजाला ॥जी॥ कुठें येतें अडवी भिंत उपाय नांहीं त्याला ॥जी॥ येथी तो किरण मार्गात मोठा अडथळा ॥ जी ॥ मिळणार कसा तेजस्वी प्रकाश सर्वाला ॥ जी ॥ कॉंग्रेस समोज वाघाना प्रकाश ना मिळला ॥ जी ॥ [ चाल ब. ] तात्यानीं घोषणा केली । हिंदुधर्म वालि । जयश्री भरलि । हिंदुधर्माच्या किर्ती रंगात । प्रतिध्वनि उठला सर्व गगनांत ॥ जी ॥ हिंदुस्थान आमुचि मायभूमी । आमुची कर्मभुमी । आमुचि पुण्यभूमी । हजांरो वर्षें नांदलों ह्यांत । धर्मराष्ट्राचे प्रेम हृदयांत । साठवुनि ठेवलं बीजांत ॥ जी ॥ झाला येथ शिवाजी राणा । संभाजिचा बाणा । पृथ्विराज राणा । खपले किती वीर धर्म युद्धात । मोखलेला लाल क्रांति रक्तांत । फडके पहा भगवा झेंडा गगनांत ॥ जी ॥ किति वीर धर्म युद्धांत । घोर पानपतात । खपलें समरांत । भगव्या झेंड्याच्या रक्षणाला । गेले किती बळी सांगा अजला । तरुणानों स्वस्थ काय बसला ॥जी॥ हिटलरांन आर्यसंस्कृती राष्ट्र बनविले ॥ जी ॥ अमेरिकन आदि शूरांनि राष्ट्र राक्षलें ॥जी ॥ म्लेच्छानीं इस्लमि राष्ट्र स्वतः कमविले ॥ जी ॥ विश्रांत स्वराष्ट्र साठीं

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1525
Date 15-1-72

वीर किती मेले ॥ जी ॥ हिंदुनो हिन्दवी राष्ट्र करुया भले ॥ जी ॥
[ चाल १ ] वंदुया भगव्या झेंड्याला । त्याग मूर्तीला । हिंदुधर्माला शूर वीरांनीं रक्षिलेला । साधुसंतांनिं । पूजिलेला ॥ जी. ॥ हरहर महादेव बोला । अेक होऊ चला । याच वेळेला । हिन्दु राष्ट्रास रक्षण्याला । पाडुनी रक्ताचे बिंदु । करुया सिंधु । लाल रक्तानें आज राष्ट्रात । फडकवूं भगवा झेंडा गगनांत ॥ जी ॥ धन धान्य वस्त्र लागते जगीं जगण्याला ॥ जी. ॥ तद्विना जगामधि कोण पुसतो कोणाला ॥ घराविना मरती किती कुत्री आड रानाला ॥ जी. ॥ स्वातंत्र्य निरर्थक ठरे राष्ट्र हीनांना ॥ जी. ॥ सर्वांत अधीं पाहिजे राष्ट्र हिन्दुना ॥ जी ॥ हिदुस्तान हेंच एकराष्ट्र अखिल हिंदुना ॥ जी. ॥ आसिंधु सिंधु पर्यंत ज्याचि आर्यभूमी ॥ जी. ॥ ही भारत भूमी ज्याला वाटे आपुली पितृभूमी ॥ जी. ॥ जो म्हणे भारत भूमिला स्वतःचि पुण्यभूमी ॥ जी ॥ तोच तो एकटा हिन्दुराष्ट्र अभिमानीं ॥ जी. ॥ बाकिचें उपरे कधि येतिल राष्ट्राच्या कामीं ॥ जी ॥ आहोत देश रक्षक राष्ट्र । स्थापक । धर्म पालक । भरत भूमीचे अम्ही हिन्दु । एक रक्ताचे सकल बंधु । राष्ट्रना अर्पु रक्त बिंदु ॥ जी ॥ लाखात एकादां हिरा अपत् समयाला ॥ जी. ॥ लाभतो राष्टमोहरा देश कार्याला । सर्वस्व अर्पुनी जाइ राष्ट्र चरणला ॥ जी. ॥ दाखवी मर्गादेशाला राष्ट्युवकाला ॥ जी ॥ तात्याराव असा एक हिरां । राष्ट्र मोहरा । स्वातंत्र्य सूर्य खरा । ( राष्ट्रसूर्य खरा ) राष्ट्र युवकाला प्रकाश देणार । मायभू दास्य मुक्तकरणार ॥ जी. ॥ शेवटीं एक विनवणि । प्रभुच्या चरणिं । शिर हें नमवुनी ।

अशिर्वाद द्यावे राष्ट्र सिंहास । आयुरारोग्य द्यावे तात्यास । विनवित शाहिर हैंच देवास ॥ जी. ॥

समाप्त

प्रकाशक:— अच्युत विनायक आगाशे सातभाईगल्ली अहमदनगर

मुद्रक:—म्यॅनेजर गं. बा. भंडरे लक्ष्मीनारायण, प्रेस चौपटीकारंजा, नगर

# आहो? नगरवासी लोकहो?? चाललात कुठ

## ईकडे या

**तरकसे** यांच्या दुकानांत फोटो ही काढतात आणि फ्रेम ही करतात.  पत्ताः— महाजनगल्ली अहमदनगर

---

## शीलानाथ आयुर्वेदिक फार्मसी

कॉटनमार्केट समोरील बंगला अहमदनगर

स्त्रीया सुखी व सुंदर होतात? सिंधू कांपाउंड अशोक वापरा! रुग्णजनास राहाण्याची उत्तम व्यवस्था

**सुमती आदर्श अयर्वेदिक गृह.**

---

## श्रीधूत पापेश्वर पनवेल लिमिटेड

यांचीं शास्त्रोक्त औशधें व

## पेणकर कटलरी कंपनी च्या

अस्सल पोलादी चाकू कातऱ्या यांचें एजंट.

**गोविंद विष्णु फडके**

१ कोर्टगल्ली अहमदनगर

२ दुकान नवा कापड बाजार

19-6-08
Ref(S)(37)


# डॉ. कुलकर्णी यांचा दातांचा दवाखाना

आमचे दवाखान्यांत दातांची सर्व कामें योग्य दरांत करून दिली जातील. **दाताचें आरोग्य म्हणजेच शरीराचें आरोग्य होय. मग हयगय कां! आजच या!** आणि आपल्या दातांच्या आरोग्याची खात्री करून जा! दांत काढणें, कवळ्या बसविणें, आणि चांदी भरणें इत्यादि सर्व कामें मनपसंत होतील.

**—:० दातांच्या आरोग्या करितां आमचें ०:—**

**— शुभ्र दंतमंजन वापरा —**

पत्ता:—**नवी पेठ आ[illegible]रांचे दुकाना जवळ**

# आयुर्वेदिक रसशाळा पुणे लि०

*** यांची शास्त्रोक्त-गुणकारी व स्वस्त औषधें वापरा ***

## रक्त वर्धक

पांडुरोग, दुर्बलता, हृद्रोग, धुपणी प्रमेह, मूत्राशय विकार यावर हटकून गुणकारी. हे घेतल्याने दरआठवड्यास चार लाख रक्त रेणू वाढतात

## सुखसारक चूर्ण

मुरडा न करतां शौचास साफ करण्यांत या चूर्णाचा हातखंडा आहे. संग्रही ठेवणें हितकारक आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे मुख्य विक्रेते—

वे. **दामोधर परशुराम आपटे चूमरेगल्लीनाका**